# मी समाजासाठी काय करू शकते?

लेखक - प्रा.सौ.आशा बिंदुमाधव जोशी

मी समाजासाठी काय करू शकते हा आपल्या सर्वांना जवळचा आणि जिव्हाळ्याचा वाटेल असा विषय आहे. प्रत्येक व्यक्ती ही समाजातच जन्माला येते, वाढते; तिचे व्यक्तिमत्व तेथेच फुलते; सर्वांगीण विकास होतोही समाजातच. जसे आईवडिलांचे ऋण तसे समाजाचे ऋण फेडणे हे त्या व्यक्तीचे कर्तव्यच ठरते.

या विषयात दोन शब्द महत्वाचे आहेत; एक ’मी’, दुसरा ’समाज’. या ’मी’ ची क्षमता, इच्छा, व्यक्तिमत्व, आजुबाजूच्या समाजाविषयी असणारी जाण, कणव, त्या समाजाच्या सुखासाठी वाटणारी तळमळ व कृतिशीलता यांचा अभ्यास आवश्यक आहे. तसेच ’समाज’ हा शब्द संकुचित अर्थाने न घेता व्यापक अर्थाने घ्यावयास हवा. छोट्या वर्तुळातील समाजसुधाराच्या व उत्कर्षाच्या बाबत लोक धन व शक्ती खर्च करतात. येथे जातिभेदातीत असा विशाल समाज गृहीत धरायला हरकत नसावी.

’मी’ चा विचार करताना थोडी आत्मस्तुती, आत्मश्लाघा येईल की काय अशी भीति वाटते. पण या ’मी’ ची क्षमता समजून घेण्यासाठी ते थोडेसे क्षम्य मानायला हवे.

मी मध्यमवर्गीय समाजात जन्मले, वाढले. एस.एस.सी. परिक्षेनंतर बडोदे विद्यापीठ व पोस्ट ऑफीस येथे नोकरी केली. दोन्ही नोकऱ्यातील भिन्न वातावरण, भिन्न लोक यांचा परिचय झाला. पोस्टातील पोस्टमनसारख्या लोकांशी जवळून परिचय व त्यांची दुःखे, समस्या यांचेही दर्शन घडले. मन विचार करीत होते, यांच्यासाठी काय करता येईल. प्राध्यापकमहोदयाशी विवाह केल्यानंतर नोकरी सोडली. बडोद्यातून एकदम महाराष्ट्रात आले. धुळे, बारामती, चाळीसगाव असा प्रवास झाला. संसार वाढला. चाळिसगावात असताना, तीन लहान मुले (४, ३, १ वर्षे) असताना मी कॉलेज शिक्षण सुरु केले. एम.ए. झाले. गुजराथी माध्यम सोडून मी मराठी विषयातील एम.ए. झाले. याच वेळी आम्ही चाळीसगाव सोडून वारणानगरला आलो व लगेचच मी मराठीची प्राध्यापिका झाले. शिकताना आणि शिकवताना मला माझ्या आयुष्याचा आधार मिळाला - ’ज्ञानेश्वरी’. याच कालावधीत मला ज्ञानेश्वरी पारायण करणाऱ्या भक्तांसमोर प्रवचन करण्याची संधी मिळाली; माझे पहिलेच प्रवचन खूप रंगले आणि गाजले आणि मी प्रवचनकार झाले! वारणानगरच्या परिसरात मी अनेक प्रवचने दिली. आजतागायत ८०० च्यावर मी प्रवचने द्यायची संधी मला मिळाली आहे. विवेकानंदानी अजरामर केलेल्या शिकागोपासून ते पावसमधील स्वरूपाश्रमापर्यंत, अमेरिकेतील सिएटलच्या महाराष्ट्रमंडळापासून ते बेळगावाजवळ शंकराचार्यांच्या मठापर्यंत आणि अनेक खेडेगावात प्रवचनाद्वारे मी ज्ञानेश्वर माऊलींचे जीवनतत्वज्ञान पोचवायचा प्रयत्न केला आहे. वारणानगर सोडण्यापूर्वी शेवटची ४ वर्षे २ मैलांवर असलेल्या कोडोलीमध्ये मी गीतामंडळ स्थापन केले होते. दर एकादशीला गीतापठण व माझे प्रवचन असायचे व गीताजयंतीला तीन दिवस मोठा समारोह असायचा. या मंडळाचे १०० वर सभासद होते.

समाजसेवेचे आणखी एक दालन मी वारणानगरमध्ये असताना अनुभवले. श्री वारणा साखर कारखान्याच्या श्री सत्कार संवर्धक मंडळाची मी प्रमुख कार्यकारी अधिकारी/मानद सचीव होते. त्या मंडळाच्या अखत्यारीत ६५ बालवाड्या व वाचनालये होती. त्यांचा कारभार पाहणे हे माझे प्रमुख काम होते. या बालवाड्यांतील शिक्षिकांची नेमणूक, त्यांचे प्रशिक्षण, पगारवाटप, त्यांना खेळणी, पुस्तके वगैरे साहित्यवाटप; त्यांना वारंवार भेटी देऊन देखरेख करणे हे सर्व मी करत असे. त्यासाठी कारखान्याकडून स्वतंत्र ऑफीस, पूर्ण वेळ जीप, ड्रायव्हर, शिपाई, कारकून, फोन वगैरे सर्व सुविधा पुरवण्यात आल्या होत्या. पहिल्या प्रथमच एक स्त्री या पदावर नियुक्त झाल्याने सर्व बालवाडी शिक्षिका आपली गाऱ्हाणी, कुचंबणा, अडचणी मोकळेपणाने मला सांगायच्या. मी त्यांचे पगार वाढवले, नियमावली निश्चित केली, त्यांच्या कार्यक्षेत्राचे वातावरण सुधारले, त्यांना सुरक्षितता मिळवून दिली; त्यांचा स्थानिक राजकारणाचा त्रास कमी केला, त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली. गावातून त्यांच्याबद्दल खोट्या तक्रारी करणारे, त्यांना त्रास देणारे गावकरी, गावगुंड, तथाकथित पुढारी. या शिक्षिकांच्या बाजूने मी ठामपणे उभी राहिले. त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी सहली काढणे, शिबिरे आयोजित करणे, त्यांच्यातील कलागुणांना वाव देणारे समारंभ भ्ररवणे वगैरे उपक्रमाद्वारे पिंजऱ्यात बंद असलेल्या मैनेप्रमाणे जगणाऱ्या या स्त्रियांना मुक्त, स्वतंत्र जीवनाचा आनंद मिळवून दिला. मी ही नोकरी सोडली व वारणानगरही सोडले त्यावेळी या सर्व शिक्षिका हमसून हमसून रडल्या. माझ्या छोट्या कार्याची पावती त्यांनी या भावपूर्ण निरोपाने मला दिली.

माझे पती १९९१ मध्ये निवृत्त झाल्यानंतर आम्ही त्यांच्या जन्मगावी शिराळे येथे आलो. येथे ५ वर्षे, १९९१ ते १९९५ दर चातुर्मासात मी तेथील भगिनींना ज्ञानेश्वरी ओवी न ओवी वाचून समजावून सांगितली. घराचा हॉल ओसंडून जाईल एवढी भगिनींची उपस्थिती रोज ज्ञानेश्वरीभक्तीत वाहून जायची. शिराळे ही माझी सासुरवाडी असूनही ते माझे माहेर वाटावे इतके प्रेम या भगिनींनी मला दिले. १९९५ साली आम्ही शिराळे सोडून पुण्यास आलो नसतो तर हा परिपाठ चालू राहिला असता. या खेडेगावातील भगिनीवर्गातून मला मिळाला एक वेगळा समाजअनुभव; भोळाभाबडा, भाविक, प्रेमाला ओसंडून दाद देणारा, अशिक्षित पण सुसंस्कृत; त्याने मला जीव लावला.

याच ५ वर्षांत माझा ’स्वाध्याय’ परिवाराशी जवळून संपर्क झाला. पां. ना. कुलकर्णी, संभाजी घोडे, नाशिककर असे पांडुरंगशास्त्री आठवलेंच्या निकट परिचयातील क्रियाशील कार्यकर्ते आमचे स्नेही झाले. १९९४ च्या दादांच्या ’मनुष्य गौरव दिन’ या वाढदिवसाच्या समारोहाला १० लाखांच्या उपस्थितीत त्यांचे प्रभावी भाषण ऐकले. दोन दिवस ऊन, वारा, भटकंती, तुफान पाऊस या पंचमहाभूतांचा आघात सोसूनही, अंगावर २४ तास ओले कपडे वागवूनही आम्हाला सर्दी खोकला सुद्धा झाला नाही. परमेश्वराचे जवळून अस्तित्व जाणवावे असाच तो अनुभव होता.

प्राध्यापिका, प्रवचनकार, बालवाड्यांची अधिकारी या विविध भूमिकांतून मी आजवर थोडी समाजसेवा केली आहे. आजही माझा पिंड समाजसेवेत रमतो. आमच्याकडे काम करणाऱ्या मोलकरणींना मी अनेकप्रकारे आर्थिक, औषधांच्या रूपाने सहाय्य करते. पोष्टात बचत करण्यासाठी

प्रेरित करते; पहिले हप्ते भरते. एजंटची गाठ घालून देऊन ही सवय कायम राहील अशी दक्षता घेते. आमच्या घरातील वाढदिवशी अंध, मूक, बधिर विद्यालयात जाऊन खाऊ वाटणे, त्यांच्यासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना देणगी देणे हे माझे आवडीचे काम आहे. अगदी परवा परवा आमच्या सोसायटीतील एका गरीब माळयाला त्याच्या शस्त्रक्रियेसाठी मदतनिधी उभारणे हे कार्य मी इतरांच्या सहाय्याने केले. अशा या गरिबांना मदत करण्याच्या गोष्टी मी आपणहून करते; तो माझा स्वभावच आहे.

समाजसेवेची माझी हौस अशी भागत असतानाही मला एक गोष्ट जाणवते की नुसत्या पैशाने सर्व प्रश्न सुटत नाहीत; किंवा नुसती सेवा पुरेशी ठरत नाही. सर्व समाज सुखी व्हावा असे वाटत असेल तर आचारविचारांची समग्र बैठक याला अनुरूप असायला हवी. समाजातून स्वार्थ, लोभ, मत्सर, हेवेदावे, भांडणे, छळवाद, दादागिरी; स्त्रियांची अवहेलना, त्यांच्यावरील अत्याचार या सर्व गोष्टी निघून जायला हव्यात. समाज निकोप, समजूतदार, एकमेकांची दु:खे समजून सहानुभूतीने वागणारा, दुसऱ्याची अडचण समजून ती दूर करण्यासाठी तत्पर असणारा, मदत करणारा असा हवा. पण तसे चित्र दिसत नाही. उलट, घरापासून सुरूवात केली तर असे दिसते की स्वार्थामुळे भावाभावामध्ये भांडणे, द्वेष मत्सराने ग्रासलेले नातेवाईक, शेजाऱ्यांमधे असलेला सहकार्याचा अभाव - ज्याला फ्लॅटसंस्कृती असे म्हटले जाते; सासू, सुनांमध्ये असलेले दुरावे यांनीच आपले दैनंदिन जीवन ग्रस्त आणि त्रस्त आहे. बाहेरच्या समाजाबद्दल बोलायचे तर आजचे सार्वजनिक जीवन पुष्कळ बोलके आहे.

हे चित्र सुधारायचे असेल तर मला वाटते, सर्व समाजाला वेगवेगळ्या स्तरावर समूपदेशनाची नितांत गरज आहे. त्यासाठी श्रीमद भगवत गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध, मनाचे श्लोक यांच्यातील अध्यात्मिक विचार त्यांच्यापर्यंत पोचवले पाहिजेत. आणि हे काम मी करू शकेन; मला ते करायला आवडेल. अनाथ बालकांसाठी अनाथाश्रम, गांजलेल्या अनाथ स्त्रियांसाठी स्त्री निवारागृहे; पीडित, एकाकी वृद्धांसाठी वृद्धाश्रम याही समाजाच्या गरजा आहेत; त्यासाठी निधी उभारण्याची आवश्यकता आहे. समाजातील सधनांना भेटून त्यांना आवाहन केले पाहिजे. मुलींना स्वतःचे रक्षण करण्यासाठी समर्थ बनवायला हवे; त्यासाठी कराटे वगैरे शिकवणाऱ्या व्यायामशाळा हव्यात. भारतातील अफाट लोकसंख्येचा समाज अनेक व्याधींनी, अडचणींनी गांजलेला आहे. 'आभाळच फाटले आहे' असे म्हणायला हरकत नाही. पण निराश न होता आपल्य़ाला जमेल ती समाजसेवा करण्याचा संकल्प करायला हरकत नसावी.

स्वप्नरंजनातून बाहेर पडून माझी क्षमता -- वय, प्रकृति, आर्थिक परिस्थिती -- यांचा विचार केला तर मी धर्मग्रंथांच्या आधारे समूपदेशनाचे, लोकांची वृत्ती सुधारण्याचे काम करू शकेन. घराघरातील गैरसमज दूर करून घर गोकुळासारखे आनंदमय बनावे या साठी मी आनंदाने मार्गदर्शन करेन. श्री गीता, ज्ञानेश्वरी, संतचरित्रे यांच्यावर प्रवचने करून समाज जागृतीचे कार्य मी करू शकेन. हे ग्रंथ माणसाचे जीवन उन्नत करतात. लोकांना या ग्रंथांच्या सहाय्याने जीवनाचा अर्थ उलगडून दाखवून, कृतार्थ जीवन कसे जगावे, जीवनात कशाला महत्व द्यावे; काय करावे, काय करू

नये हे मी समजावून देऊ शकेन. जीवन आनंदमय, प्रेममय, ज्ञानमय, सौंदर्यमय आहे हे मी त्यांना विशद करून देईन. श्री ज्ञानेश्वर माऊलींची प्रतिज्ञा 'तैसा वाग्विलास विस्तारू। गीतार्थे विश्व भरू॥' जीवनात साकार करण्यासाठी किंवा 'अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदे भरीन तिन्ही लोक॥' हा आशावाद सार्थ करण्यासाठी मी माझ्या सद्‌गुरु श्री ज्ञानेश्वरमाऊलींच्या आदेशानुसार समाजकार्य करेन.

माझ्या कुवतीनुसार व समाजाच्या प्रतिसादानुसार आजही माझे हे कार्य चालू आहे; पुढेही चालू राहील.